CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -28 , Vol. 2 | Jan. 2020 | Peer Reviewerd

Shivaji College Dist. Hingoli

# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 28, Vol. 2**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
**Dr. B. G. Gaikwad**
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Dr Dr. Balasaheb S. Kshirsagar**
Director, Gandhian Studies Centre
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Dhale S.U.**
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Hurgule N.R.**
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

**Shaurya Publication, Latur**

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor – (SJIF) – 7. 139 | Special Issue -28 , Vol. 2 | Jan. 2020 | Peer Reviewerd

34. महात्मा गांधी आणि भारतीय स्वातंत्र्यचळवळ 88
प्रा.डॉ.छाया भास्कर भोज,

35. महात्मा गांधी यांचे शिक्षण विचार 90
प्रा.डॉ.श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

36. महात्मा गांधीचे आर्थिक विचार आणि शाश्वत विकास : एक अभ्यास 92
डॉ. सावके बी. एस.

37. महात्मा गांधी यांचे सत्य आणि अहिंसेविषयक विचार 95
डॉ.चव्हाण संजय संदिपान

38. 21 व्या शतकात महात्मा गांधीजींचेसत्य आणि अहिंसेसंबंधीचेविचार एक काळाची गरज 99
साह्य. प्रा. स्वानकर राहुल मा-

39. **महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास : एक दृष्टिक्षेप** 102
प्रा.डॉ.पी.व्ही.माने

40. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात गांधींच्या असहकार आंदोलनाचा हुंकार (इ.स. 1920-22) 104
डॉ. मुंढे सविता गंगाधरराव

41. गांधीवाद आणि मराठी साहित्य 107
प्रा. कृष्णा सुदामराव इंगळे

42. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास 109
डॉ.प्रा.सौ. एस.पी. लाखे

43. **महात्मा गांधी यांच्या विविध चळवळी** 112
**प्रा. मनोहर वागतकर**

44. महात्मा गांधी यांच्या मुलोद्योगी शिक्षणाचा अभ्यास 115
प्रा. डॉ. विठ्ठल गो. घोनशेटवाड

45. महात्मा गांधीजीचे सत्य व अहिंसासंबधीचे विचार 117
प्रा. डॉ.साहेब राठोड

46. **महात्मा गांधी यांचे शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजीक विचार** 120
**प्रा.डॉ. कांबळे बिभिषन विठ्ठलराव**

47. "21 व्या शतकात महात्मा गांधीच्या विचारांची उपयुक्तता" 124
प्रा.डॉ.विलास गायकवाड

48. महात्मा गांधी - शिक्षण विषयक विचार
सीमा बाबुराव उप्पलवार

49. **महात्मा गांधीयांचे सत्य आणि अहिंसेविषयक विचार** 130
**प्रा.डॉ.बोचरे जे.एम.**

50. **महात्मा गांधीच्या आर्थिक व सामाजिक विचारांची यथार्थता** 133
**डॉ. शंकर मारोती सावंत**

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधी यांचे शिक्षण विचार

**प्रा.डॉ.श्रीराम मारोतराव कऱ्हाळे**

मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

जगावर महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला आहे.महात्मा गांधीजींना राष्ट्रपिता असा सन्मानपूर्वक उल्लेख नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 1944 मध्ये केला. तर गांधीजींना महात्मा ही उपाधी सर्वप्रथम रविंद्रनाथ टागोर यांनी दिली. महात्मा गांधींची जयंती ही आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरी केली जाते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींचे महत्वाचे योगदान आहे. गांधीजींचे बहुरूपी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या चरित्राच्या आणि व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंचा शोध घेण्याचे काम आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही थांबलेले नाहीत.समकालीन समस्यांच्या निदानासाठी त्यांचे विचार उपयुक्त ठरत आहेत.गांधी हे महान विचारवंत, समाजसुधारक,स्वातंत्र्य लढयाचे सेनापती ,सत्याग्रहाच्या तत्वज्ञानाचे प्रवर्तक,धर्म आणि नीतीचा समरसता साधणारे संत ,राजकारणाला नैतिकतेचे अधिष्ठान देणारे नेते, स्त्रियांचे कैवारी,दलितांचे पाठिराखे,शिक्षणाचा मूलभूत विचार करणारे शिक्षणशास्त्री अशा अनेक विशेषांनी त्यांची महती आपल्याला दिसून येते.

गांधीजींची महती स्पष्ट करतांना फ्रांसमधील लियॉन ब्लमने म्हटले आहे की," मी गांधीजींना कधी पाहिले नाही ,त्यांची भाषा मला अवगत नाही आणि त्यांच्या देशात मी कधी पाय ठेवला नाही,तरी पण त्यांच्या मृत्यूने अगदी जवळच्या दोस्ताचा मृत्यू झाल्यासारखे मला दुःख होत आहे."1 या विचारवंताच्या या केलेल्या वक्तव्यावरून गांधीजींच्या कार्याची कल्पना येते.गोपाळकृष्ण गोखले यांनी 1909साली महात्मा गांधी संबंधी म्हटले होते की," माझया जीवनाचे एक सौभाग्य आहे की, मी गांधीजीला जवळून ओळखतो आणि मी आपणाला सांगू शकतो की, त्यांच्या पवित्र शुध्दहृदय साहसी उदात्मा व्यक्तीने यापृथ्वीवर यापूर्वी कधी जन्म घेतला नाही असे ते व्यक्ती होते."2 यावरून महात्मा गांधीमध्ये अनेक गुण असल्याचे स्पष्ट होते.

गांधी बदल गौरवोदगार काढताना प्रा.विजयता विटनकर म्हणतात," राष्ट्रपिता महात्मा गांधी खरोखरच एक युगपुरूष होते.खर सांगायचे झाल्यास गौतम बुध्दानंतर महात्मा गांधीजींनींच यशस्विरीत्या भारतीय परंपरा आणि मूल्यव्यवस्थेवर आधारित सत्या आणि अहिंसेच्या विचारांना केवळच जगासमोर ठेवले नाही तर त्याला मूर्तरूप देखील दिले.गांधीजींच्या जीवनाचा मोठेपणा हयातच आहे की, हे विचार केवळ समाजासाठीच मांडले असे नाही तर त्यांनी हयांना आपल्या स्वत:च्या जीवनशैलीचा एक भाग बनविले,त्यांना स्वत:अंगिकारले, सत्यतेच्या कसोटीवर परीक्षण करून प्रथम स्वत: आचरणात आणले." 3 हे गुण महात्माजींच्या अंगी होते.

मानवाने शिक्षणातून आपला विकास घडवून आणला आहे. मानवी जीवनातील अडथळे शिक्षणातून दूर करता येउ शकतात. समाजाची प्रगती साधायची असेल तर समाजासाठी सर्वांना शिक्षणाची संधी प्राप्त करून देणे महत्वाचे आहे.शिकेल तो टिकेल अशी संकल्पना आजच्या परिस्थितीत मांडली जाते.मानवाला जीवन जगण्यासाठी अन्न , वस्त्र, आणि निवारा या मुलभूत गरजा जशा महत्वाच्या आहेत त्याप्रमाणे शिक्षण देखील महत्वाचे आहे. गांधींनी शिक्षणाचे महत्व पटवून दिले.महात्माजींनी शिक्षणाला राष्ट्राचा आत्मा मानले. भावी पिढयांच्या सशक्त जीवनासाठी आणि राष्ट्र उभारणीस कारक ठरणाऱ्या जबाबदार नागरिकांची निर्मिती ज्या शिक्षण् व्यवस्थेतून करता येईल अशी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी आपल्या चिंतनाची दिशा निश्चीत झाली पाहिजे.ही त्यांची विचार श्रेणी होती. शिक्षणाने शरीर, बुध्दी व हृदयाचा समतोल विकास झाला पाहिजे.भारतीय शिक्षणपध्दती विषयी गांधीजी म्हणतात की," हिंदूस्थानच्या शिक्षणसंस्थामध्ये स्विकारण्यात आलेल्या शिक्षण पध्दतीला मी शिक्षण् म्हणत नाही.शिक्षण् म्हणजे मनुष्यात जे सर्वोत्कृष्ट ,ते बाहेर प्रकट होउ देणे. आजचे शिक्षण हे शिक्षण नव्हे, मनाचा व्याभिचार आहे. ते फक्त मनाला माहिती पुरविण्याचे काम करते. पण ग्रामीण हस्तोधोगांच्या मनाला वळण लावण्याची क्रिया मध्यवर्ती धरल्याने मनाची खरीखुरी शिस्तबध्द वाढ होईल आणि बौध्दीक शक्ती आणि अप्रत्यक्षपणे आत्मीक शक्ती सुध्दा राखली जाईल."4शिक्षण म्हणजे मनूष्याचा विकास होय.शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे साधन होय.

सर्वांगीन विकास हे महात्मा गांधीच्या शिक्षणप्रणालीचे उदिष्ट होते.शिक्षक कसा असावा या विषयीचे मत ते मांडतात, " माझी अशी समजूत आहे की शिक्षक हेच विधार्थ्यांचे पाठयपुस्तक असावे. शिक्षकांनी पुस्तकातून शिकविलेले असे फारच [illegible] स्मरणात आहे. त्यांनी स्वमुखाने शिकविले ते मात्र आजही आठवते."5 शिक्षणातून दैनंदिन व्यावहाराची माहिती मि[illegible] पुस्तकातील ज्ञानापेक्षा शिक्षकांनी दिलेले ज्ञान आयुष्यभ्र उपयोगी पडते.

गांधीजी म्हणत " शिक्षणाला शुध्द चारित्रयाची बैठक नसेल तर त्या शिक्षणाची किंमत शुन्य आहे. त्या शिक्षणाला सत्य निष्ठेचा व शुध्दतेचा भरभक्कम आधार नसेल तर ते कुचकामी ठरेल.आपल्या जीवनातील व्यक्तिगत शुध्दता , पावित्रय यांकडे तुमचे लक्ष नसेल तर तुमचा नाश होईलकेवळ तुमचया पांडित्याला काहीही किंमत नाही."6

आज समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढले असले तरी समाजातील हिंसाचार, गुन्हेगारीचे प्रमाण ही वाढलेले दिसून येते. शिक्षणातील चारित्रशिलता लोप पावत चाललेली दिसून येते.सत्य निष्ठा, चारित्रयशिल [illegible]आहे. माणसाला

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq & Dist.Hingoli.(MS.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli



233

माणूस बनविणारे शिक्षण आज महत्वाचे आहे. गांधीजींनी सांगितल्या प्रमाणे प्राथमिक शिक्षण हा शिक्षण व्यावस्थेचा पाया होय.गांधीजीच्या मते प्राथमिक शिक्षण हे वयाच्या सातव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत दिले जावे.प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केल्याने जनतेचे कल्याण होते. शिक्षण हे मातृभाषेतून दिले गेले पाहिजे असे गांधीजीना वाटत होते. मातृभाषा ही दैनंदिन बोलीभाषाअसते त्यामूळेशिकणाऱ्याला सहज अवगतहोते. त्यातील संकेत,संदेश कळतात. शिक्षणात गोडी निर्माण होते.परंतु दुसऱ्या भाषेतून शिक्षण दिले तर ते कंटाळवाने वाटू लागते. अशी भाषा ही कळत नसल्याने त्या भाषेविषयी आवड निर्माण होत नाही. पर्यायी शिक्षण नकोसे होते.म्हणून शिक्षण हे मातृभाषेतून दिले पाहिजे.

शिक्षण हे मन, मेंदू, आणि मनगट बळकट करणारे असावे. माणसाच्या बुध्दीमतेचा संपूर्ण विकास व्हावा.नवनिर्मिती करण्याचे सामर्थ्य निर्मान व्हावे. त्यांच्यात शिलसंपन्नता यावी. प्रौढशिक्षणदिले जावे. ज्यांना लहान वयात शिक्षण घेता आले नाही.अशा लोकांना शिकवून शहाणे केले पाहिजे.त्यामूळे लोकांमध्ये जाणीव,जागृती, प्रबोधन होण्यास मदत होते.महात्मा गांधीनी स्त्री शिक्षणाचे समर्थन करून स्त्री शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी कार्य केले.

## निष्कर्ष

महात्मा गांधीनी शिक्षणाला प्राथमिकता दिली. सर्वांना शिक्षण मिळणे गरजेचे आहे.त्यासाठी प्रौढ लोकांनाही शिक्षण दिले पाहिजे.समाजातील स्त्री वर्ग शिक्षणापासून वंचित होता.त्यांच्यामध्ये जाणीव जागृतीनिर्माण व्हावी यासाठी ही विचार मांडले. तसेच मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे हे मत त्यांनी मांडले.शिक्षण हे उत्कृष्ट असावे.शिक्षणामूळे माणसांच्या सर्व गुणांचा विकास व्हावा.माणसात नितीमत्ता, माणूसकी, दयाभाव ,अहिंसा या तत्वाचा अंगिकार व्हावा.माणसाचे मन ,बुध्दी,मनगट बळकट करणारे शिक्षण असावे. शिक्षण घेतलेला तरूण कार्यक्षम झाला पाहिजे. असे शिक्षण विषयक विचार गांधीजीनी मांडले आहेत.या विचाराची आजच्याकाळात खूप गरज आहे.आज शिक्षण मातृभाषेतून दिले जात नाही.मुलांना मातृभाषा येत नाही आणि परकीय भाषा ही येताना दिसतनाही. आज शिक्षणाने माणस सुशील होताना दिसत नाहीत तर आपलाच स्वार्थ साधताना दिसतात.जी काही मंडळी दान करताना दिसतात त्यापैकी ऐंशी टक्के हे सातारा लुटतात आणि पुण्याल दान करतात.अशी ही वाईट अवस्था चालू आहे.शिक्षणाने नितीमान माणूस घडविला जावा. अशा शिक्षणाची आज आवश्यकता आहे.

## संदर्भसुची


1. डॉ.अरविंद श्रंगारपूरे,समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन,नागपूर, पृ. 22
2. प्रा. किशोर राउत,ग्रामिण विकास आणि गांधी विचारधारामूल्य व्यवस्था गांधी विचार,निर्मल प्रकाशन ,नांदेड,पृ. 434.
3. प्रा. विजयता म. बिटनकर Relevance of Mahatma Gandhis Ideology in the Present Scenario ; Preashant Publications पृ. 502 .
4. डॉ. पंजाब चव्हाण, मूल्यव्यवस्था : गांधी विचार, निर्मल प्रकाशन,नांदेड,पृ. 327.
5. मो.के. दामले, महात्मा गांधी-सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.2013 पृ.339
6. महात्मा गांधी-सत्याचे प्रयोग , साकेत प्रकाशन, औरंगाबाद.2009 पृ.252.


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)